भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2020 ◑ XL 770663

अ.नं. ४८७७ किंमत रु.१०० फी रु.१ दि. ३०/१२/२०२०

श्री./सौ. भिमराव जोतिबा शिंदे

रा. गडहिंग्लज ता. गडहिंग्लज

29 DEC 2020

SUB. TREASURY OFFICE GADHINGLAJ

परवाना क्र. ... कोड नं. 2606007

# शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर

अनुराज, ७ /ब, सुर्यवंशी कॉलनी अ, सानेगुरूजी वासहत,
कोल्हापूर–४१६०१२

## आणि

## कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.–४१६५०२.

## या संस्थामधील सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

**शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर**
**आणि**
**कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.—४१६५०२.**

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे. मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी ज्ञानप्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात. त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र, परिसंवाद, कार्यशाळेचे आयोजन केले जाते. विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे, कार्यशाळांमध्ये बौध्दिक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टीने निबंधलेखन, कथालेखन, काव्यलेखन, कथाकथन, काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधाना पारितोषिक, ललित, ललितेत्तर, संपादीत ग्रंथाना पारितोषिक दिले जाते. संघामार्फत 'शिविम संशोधन पत्रिका' हे विव्दत्प्रमाणित (Pear Reviewed Research Journal) त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISBN No 2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्तयादीमध्ये पत्रिकेचा समावेश झालेला आहे. वरील नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर ४१६०११ आणि कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लज जि.कोल्हापूर — ४१६५०२ या संस्था दिनांक १ जानेवारी २०२१ रोजी एकमेकाबरोबर सामंजस्य करार करत आहेत. या कराराची उदिष्टये खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**उद्दिष्टये**

१. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती याचे संवर्धन करणे आणि विविध विषयावर संशोधन प्रकल्प राबविणे.
२. चर्चासत्र कार्यशाळा, परिसंवाद, काव्यसंमेलन, साहित्यसंमेलन, संयुक्त बैठकांचे आयोजन करणे
३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र, पदविका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.
४. निबंध, वक्तृत्व, वाद—विवाद, प्रश्नमंजूषा, कथालेख, काव्यलेखन, काव्यवाचन, कथाकथन स्पर्धाचे अयोजन करणे.

५. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे

७.दरवर्षी कोल्हापूर, सांगली, सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसांचे अधिवेशन विविध साहित्य विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापंकाच्या शैक्षणिक तसेच विषयाच्या समस्यांवर चर्चा करणे.

८. सर्जनशील लेखन, उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडी लिपी, मुद्रितशोधन, पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०.ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे, ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती या संबधाने येणा—या समस्या व अडचणी विद्यापीठ, शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग, दिल्ली यांना यासंदर्भात सूचना — पत्रव्यवहार करणे.

१२.'शिविम संशोधन पत्रिका' हे विव्दत्प्रमाणित त्रैमासिक प्रसिध्द करणे.

**एकमेकाना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबीमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.

२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे

३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.

४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.

५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करून विचारविनिमय करणे.

६. शासन, साहित्य अकादमी, मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ, राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

**अटी आणि शर्थी**

१. संघाच्या सर्व कार्यक्रमामध्ये, अधिवेशनामध्ये, चर्चासत्रामध्ये आणि उपक्रमामध्ये महाविद्यालयातील मराठी विभागाने तसेच संघाच्या सभासंदानी सहभागी होणे, हजर राहणे बधंनकारक आहे.



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ • कोल्हापूर •

२. संघाचा एखादा कार्यक्रम, उपक्रम महाविद्यालयाने राबवायचा असल्यास संकल्पित आर्थिक तरतूद संघ करेल मात्र महाविद्यालयाने सर्व सुविधा पुरावाव्यात सदर कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य, संस्थेचे पदाधिकारी यांना समारंभात योग्य स्थान देऊन त्यांचा संघाने योग्य असा सन्मान करणे बंधनकारक आहे.

३. महाविद्यालयाने चर्चासत्र, कार्यशाळा, परिसवांद अशा कार्यक्रमाचे आयोजन करायचे असल्यास संघाला बैध्दिक सहयोगी करून घेणे बंधनकारक आहे. सदर कार्यक्रमास संघ संपूर्ण सहकार्य करेल. निमंत्रणपत्रिका, प्रमाणपत्र, बॅनर यावर संघाचे नाव, बोधचिन्ह आणि अध्यक्ष/सचिव यांची नावे असावित. अध्यक्ष/सचिव यांना समारंभात योग्य स्थान देऊन त्यांचा प्रवास खर्च द्यावा.

४. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल. (सदर कराराचा कालावधी ५ वर्षांचा राहील)

| | | | |
|---|---|---|---|
| प्रा. भिमराव शिंदे<br>विभाग प्रमुख | डॉ. सुरेश चव्हाण<br>प्र.प्राचार्य | प्रा.डॉ. प्रकाश मुकळे<br>सचिव | प्रा.डॉ. शिवकुमार सोनाळकर<br>अध्यक्ष |

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

| | |
|---|---|
| प्रा. डॉ. शर्मिला घाटगे<br>समन्वयक | श्री. समीर कूलकर्णी<br>ग्रंथपाल |